# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,

गडचिरोली दि. ०५/०१/२०१७

आज दिनांक ०५/०१/२०१७ रोजी उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोमके सावरगाव हद्दीतील मौजा केकावाही (मसद) गावचे रहिवासी सुखराम लालसू वडडे, वय - ३५ वर्ष यांची नक्षलवादयांनी हत्या केली.

सुखराम लालसू वडडे हा पुर्वी टिपागड एरियामध्ये नक्षल मिलीशिया सदस्य म्हणून कार्यरत होता. जुलै २०१६ मध्ये सुखराम वडडे याने नक्षल चळवळीला कंटाळून जिल्हा पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले होते. आत्मसमर्पण केल्यानंतर तो गावामध्येच शेती करीत होता. सुखराम वडडे याने आत्मसमर्पण केल्याचा राग मनात धरुन  काल रात्री काही नक्षलवादी त्याच्या घरामध्ये घुसून त्याला गावाबाहेर घेवून गेले व त्याचेवर धारदार शस्त्राने वार करुन त्याची हत्या केली.

घटनेनंतर सदर परिसरात नक्षल शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आलेली आहे. नक्षल्यांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला असून घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.